# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.02.2026** **वार-** मंगळवार

---

**मुख्यमंत्री-पुरंदरविमानतळ**

वेगानं होत असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे पुणे शहर आणि परिसरात औद्योगिकीकरण वाढत आहे. भविष्यातील पुणे शहराची गरज लक्षात घेऊन पुरंदर विमानतळाची निर्मिती करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. पुरंदर विमानतळ विकासकामांच्या आज मुंबईत झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

**सुनेत्रापवार-पालकमंत्री**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची पुणे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाने आज यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर या जिल्ह्यांचे पालकमंत्री पद रिक्त झाले होते.

पुणेमहापौर

पुणे महापालिकेच्या महापौर पदासाठी भाजपकडून नगरसेविका मंजुषा नागपुरे तर, काँग्रेस पक्षातर्फे अश्विनी लांडगे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. उपमहापौर पदासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या आठवले गटाचे परशुराम वाडेकर यांना उमेदवारी देण्यात आली असून, काँग्रेस पक्षातर्फे साहिल

केदारी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. येत्या नऊ तारखेला महापौरपदाची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

**जिल्हा परिषदनिवडणूक**

आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या कामकाजाकरता पुणे जिल्ह्यातील १३ तालुक्यांत मिळून, २३ हजार ११४ मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तसंच जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. जिल्ह्यात एकंदर ३ हजार ६०५ मतदान केंद्रं स्थापन करण्यात येणार असून, प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे १३ आदर्श आणि महिला मतदान केंद्र असणार आहेत.

**रस्तासुरक्षासप्ताह**

३७ व्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिन्याच्या अनुषंगानं, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या पुण्यात नुकताच, 'रस्ता सुरक्षा जनजागृती आणि प्रशिक्षण' कार्यक्रम संपन्न झाला. रस्ते अपघातांचं प्रमाण कमी करण्यासोबतच नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करणं हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमात रस्ता सुरक्षा, सुरक्षा लेखापरीक्षण, अपघातानंतरचं तातडीचे बचावकार्य आदि विषयांवर माहिती आणि प्रात्यक्षिकं दाखवण्यात आली.

**शहरअभियंता**

पुणे महापालिकेच्या शहर अभियंतापदी अनिरुद्ध पावसकर यांची नियुक्ती करण्यात आली असून आज त्यांनी पदभार स्वीकारला. महापालिका हद्दीत बांधकाम परवानगी देताना कृत्रिम बुद्धिमत्ता वापरण्याबाबत प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.

**कुसुममोहीम**

राज्यात, 1 फेब्रुवारी ते 13 फेबुवारीदारम्यांन 'स्पर्श' आणि 'कुसुम' ही कुष्ठरोग निवारण जनजागृती मोहीम राबवली जात आहे. 2027 सालापर्यंत राज्य कुष्ठरोगमुक्त करणं हा या मोहिमेचा उद्देश आहे. मोहिमेदारम्यांन, संशयित रुग्णांची तपासणी, निदान आणि उपचार सुरू करून संसर्गाची साखळी खंडित करण्यावर भर देण्यात येणार आहे; तसेच सहवासितांची तपासणी करून पात्र व्यक्तींना प्रतिबंधात्मक औषधोपचार देण्यात येणार असल्याची माहिती, राज्याचे कुष्ठरोग आणि क्षयरोग विभागाचे संयुक्त संचालक डॉ. राजरत्न वाघमारे यांनी दिली.

**सूर्यादत्ता-पुरस्कार**

सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या २८ व्या वर्धापनदिनानिमित्त देण्यात येणाऱ्या ' जीवनगौरव' आणि 'राष्ट्रीय' पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. माजी सरन्यायाधीश उदय लळित, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, अभिनेते राकेश बेदी यांसह 13 जणांची 'जीवनगौरव पुरस्कारासाठी' तर, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे महेश सूर्यवंशी, ग्रँडमास्टर अभिजित कुंटे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुरेंद्रा कुमारी, योग प्रशिक्षक राखी गुगळे, यांसह 12 जणांची राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. येत्या शनिवारी, 7 तारखेला पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे.

**पिंपरी-चिंचवड-करवसुली**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून मालमत्ता कर वसुलीची मोहीम सुरू आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी महापालिकेचं मुख्य कार्यालय तसेच शहरातील १८ विभागीय कर संकलन कार्यालयं शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत. नागरिकांनी आपला थकीत मालमत्ता कर वेळेत भरावा, असं आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**काळाघोडाफेस्टिवल**

मुंबई येथील काळा घोडा फेस्टिव्हल २०२६ अंतर्गत आयोजित, चिल्ड्रन्स इन्स्टॉलेशन विभागात पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थेरगाव इथल्या यशवंतराव चव्हाण प्राथमिक कन्या शाळेनं प्रथम क्रमांकाचं पारितोषिक पटकावलं. या विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंचा वापर करून तयार केलेली “मानवी विचारांचे रोलरकोस्टर” ही रचना विशेष लक्षवेधी ठरली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 30 अंश तर किमान तापमान 14 पूर्णांक 3 अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमान साधारण असंच राहील असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृतान्त. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**